NAAC'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## परिपत्रक

**विषय: करोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्य शासकीय कार्यालयांतील अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रित करण्याबाबत.**

**संदर्भ : १. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. समय-२०२०/प्र. क्र.३५/१८(र.व.का.)** दि. १८ मार्च २०२०
**२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, संकिर्ण-२०२०/प्र.क्र.६०/२०/तांशि-१ दि.१९ मार्च २०२०**

उपरोक्त विषय व संदर्भांकित अनुषंगाने सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक, चिफ रेक्टर्स व प्रशासकीय विभाग प्रमुख यांना आदेशांन्वये कळविण्यात येते की, करोना विषाणूचा प्रसार राज्यातील कार्यालयामध्ये होऊ नये तसेच राज्यातील अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचा संसर्ग होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमधील गर्दी कमी करणे आवश्यक आहे. त्यामूळे तातडीची उपाययोजना म्हणून अत्यावश्यक सेवा वगळून खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. विभागातील तातडीचे व महत्त्वाचे काम चालू राहण्याच्या दृष्टीने संबंधित अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक, चिफ रेक्टर व प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी सर्व अधिकारी / कर्मचारी यांना दररोज कार्यालयात न बोलाविता त्यांना आळीपाळीने **(Rotation)** कार्यालयात बोलवावे.

२. विभागातील एकूण अधिकारी / कर्मचारी यांची संख्या **५० टक्के** राहील याची दक्षता घेण्यात यावी.

३. ५० टक्के संख्या उपस्थितीबाबतची माहिती/ अहवाल आस्थापना विभागास ३१ मार्च २०२० नंतर सादर करण्यात यावा.

४. सदर कालावधीत फक्त अत्यावश्यक सेवेकडील एकत्रित मानधन/ रोजंदारी कर्मचारी उपस्थित राहतील.

५. सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक, चिफ रेक्टर व प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी आपल्या विभागाकडे असणा-या एकत्रित मानधन/ रोजंदारी सेवक यापैकी ज्या सेवकांची तातडीची आवश्यकता आहे अशा सेवकांना उपस्थित राहणेबाबत आपल्या स्तरावर सुचना देण्यात याव्यात.

६. सदर निर्देश हे ३१ मार्च २०२० पर्यंत लागू राहतील.

७. ज्या अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळेल, त्यांनी त्यांची प्रलंबित राहिलेली कामे कार्यालयातील उपस्थितीच्या दिवशी पूर्ण करावीत.

८. सदर कालावधीमध्ये आरोग्यविषय/ आपत्कालीन सेवा सुरू राहतील.

९. अधिकारी / कर्मचारी यांच्या रजेबाबत सदर शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी.

**(डॉ. विलास द. नांदवडेकर)**
कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/** 829
दि. 19 MAR 2020
**प्रति,**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, रेक्टर्स. प्रशासकीय विभागप्रमुख.
२) सर्व मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

**विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक व सर्व प्रशासकीय अधिकारी/सेवकांच्या निदर्शनास आणावे**

महाराष्ट्र शासन

तात्काळ

क्रमांक :संकिर्ण-२०२०/प्र.क्र.६०/२०/तांशि-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरुचौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दि. १९ मार्च, २०२०.

प्रति,

मा. कुलगुरु,
सर्व अकृषी /अभिमत/तंत्रशास्त्र/स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे,

विषय : राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कार्यालयांतील अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रीत करण्याबाबत

संदर्भ : १. सार्वजनिक आरोग्य विभाग,पत्र क्र. करोना -२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५, दि.१४/०३/२०२०.
२. सार्वजनिक आरोग्य विभाग,पत्र क्र. करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५, दि.१५/०३/२०२०.
३. शासन पत्र,उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकिर्ण-२०२०/प्र.क्र.६०/२०/तांशि-१ दि. १६.०३.२०२०
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.समय-२०२०/प्र.क्र.३५/१८(र.व का.) दि.१८.०३.२०२०

जगभरातील अनेक देशात कोरोना विषाणूंचा प्रसार झाला आहे. कोरोना विषाणूं बाधीत रुग्ण आपल्या देशातील कांही ठिकाणी आढळून आले आहेत. कोरोना विषाणूंचा प्रसार राज्यातील कार्यालयांमध्ये होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून तातडीने सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमधील गर्दी कमी करणे आवश्यक आहे.यानुषंगाने शासकीय कार्यालयांची तातडीची व महत्वाची कामे चालू राहण्याच्या दृष्टीने संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना दररोज कार्यालयात न बोलवता त्यांना आळीपाळीने (Rotation) कार्यालयात बोलवावे तसेच उपस्थित अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयीन वेळेमध्ये लवचिकतेची सवलत देण्यासंदर्भात विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा, जेणेकरुन सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील अनावश्यक गर्दी कमी होऊ शकेल.तसेच अशा प्रकारे कार्यवाही करतांना कार्यालयातील एकूण अधिकारी/कर्मचारी यांची संख्या ५० टक्के राहिल, याची दक्षता घेण्यात यावी.अशाप्रकारे ज्या अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळेल त्यांनी त्यांची प्रलंबित राहिलेली कामे कार्यालयातील उपस्थितीच्या दिवशी पूर्ण करावीत अशा सूचना सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.(४) येथिल शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत.

२. सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन क्र.(४) येथिल शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचना राज्यातील सर्व अकृषी / अभिमत/तंत्रशास्त्र / स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यांनाही लागू राहतील. या सूचनांच्या धर्तीवर आपल्या अधिपत्याखालील अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना आपल्यास्तरावरुन योग्य ते निर्देश देण्यात यावेत. तसेच, आपल्या अधिपत्याखालील शैक्षणिक संस्थांमधील आरोग्यविषयक /आपत्कालीन सेवा सुरु राहतील तसेच कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत स्थानिक प्रशासन / सार्वजनिक आरोग्य विभाग/आपत्ती व्यवस्थापन यंत्रणां यांच्याकडून शैक्षणिक संस्थेस प्राप्त होणा-या निर्देशाचे पालन करणे अनिवार्य राहील.

३. सदरचे निर्देश हे दि. ३१.०३.२०२० पर्यंत लागू राहतील

(सतीश ज. तिडके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाही करिता,

१. मा. राज्यपालांचे सचिव,राजभवन,मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई.
४. मा. मंत्री,उच्च तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
५. मा. राज्यमंत्री,उच्च तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
६. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव,मंत्रालय,मुंबई.
७. सर्व विभागीय आयुक्त.
८. सर्व जिल्हाधिकारी.
९. संचालक,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य ,पुणे.
१०. संचालक,तंत्रशिक्षण,संचालक,कला,संचालक, ग्रंथालय संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई .
११. संचालक,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई
१२. निवडनस्ती-तांशि-१.

**कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्य शासकीय कार्यालयांतील अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः समय- २०२०/ प्र. क्र.३५/१८ (र. व का.)**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १८ मार्च, २०२०.

**शासन निर्णय :**

जगभरातील अनेक देशांमध्ये कोरोना विषाणूंचा प्रसार झाला आहे. त्यामुळे आरोग्यविषयक गंभीर समस्या निर्माण झाली असून मोठ्या प्रमाणावर जिवित हानी होत आहे. कोरोना विषाणूंमुळे बाधित रुग्ण आपल्या देशातील काही ठिकाणी आढळून आले आहेत.

२. वरील पार्श्वभूमीवर, कोरोना विषाणूंचा (COVID-19) प्रसार राज्यातील कार्यालयांमध्ये होऊ नये तसेच राज्यातील अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचा संसर्ग होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमधील गर्दी कमी करणे आवश्यक आहे. त्यामुळे तातडीची उपाययोजना म्हणून राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांना पुढील निदेश देण्यात येत आहेत.

अ) या पार्श्वभूमीवर शासकीय कार्यालयाचे तातडीचे व महत्त्वाचे काम चालू राहण्याच्या दृष्टीने संबंधित विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी, त्यांचे नियंत्रणाखालील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना दररोज कार्यालयात न बोलाविता त्यांना आळीपाळीने (Rotation) कार्यालयात बोलवावे. तसेच उपस्थित अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयीन वेळेमध्ये लवचिकतेची सवलत देण्यासंदर्भातसुद्धा विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा, जेणेकरून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमधील अनावश्यक गर्दी कमी होऊ शकेल. अशा प्रकारे कार्यवाही करताना कार्यालयातील एकूण अधिकारी / कर्मचारी यांची संख्या ५० टक्के राहील, याची दक्षता घेण्यात यावी. अशा प्रकारे ज्या अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळेल, त्यांनी त्यांची प्रलंबित राहिलेली कामे कार्यालयातील उपस्थितीच्या दिवशी पूर्ण करावीत.

आ) मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या बाबतीत मंत्रालयीन विभागातील सचिवांना त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी / कर्मचारी यांच्यासंदर्भात वरील अधिकार असतील. यासंदर्भात संबंधित सचिवांनी वरील परिच्छेद-२ (अ) मधील मुद्यांबाबत त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी / कर्मचारी यांचेबाबत निर्णय घ्यावा.

इ) वरील परिच्छेद-२ (अ) व (आ) बाबत विभागातील आस्थापना शाखेस अवगत करण्यात यावे, जेणेकरून अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबतची उचित नोंद घेणे आस्थापना शाखेस शक्य होईल.

ई) शासकीय कार्यालयातील जे अधिकारी / कर्मचारी या आपत्कालीन परिस्थितीत रजा घेऊ इच्छितात त्यांना तातडीने रजा मंजूर करावी. तसेच वैद्यकीय प्रमाणपत्र सादर न करता परिवर्तित रजासुद्धा संबंधितांना मंजूर करण्यास हरकत नाही.

उ) सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचा संपर्क पत्ता, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी कार्यालयास उपलब्ध करून द्यावा. तसेच संपर्क पत्त्यावर ते उपलब्ध याची दक्षता घ्यावी. तसेच कार्यालयात उपस्थित राहण्याच्या सूचना प्राप्त झाल्यास त्यांना त्यानुसार कार्यालयामध्ये उपस्थित राहणे अनिवार्य राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

ऊ) उक्त आदेश सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग तसेच त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयांना लागू राहणार नाहीत. त्याचप्रमाणे क्षेत्रिय स्तरावर ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामकाजाचा भाग म्हणून कार्यालयाबाहेर भेटी देणे आवश्यक असते (Field Duties) अशा कार्यालयांना त्याचप्रमाणे आपत्कालीन / अत्यावश्यक सेवा देणाऱ्या कार्यालयांनासुद्धा वरील आदेश लागू राहणार नाहीत.

उ) सदरचे आदेश दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत आपत्कालीन परिस्थिती म्हणून लागू राहतील.

३. तरी सर्व मंत्रालयीन विभाग तसेच मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील सर्व राज्य शासकीय कार्यालयांनी सदर सूचनांनुसार अंमलबजावणी करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२००३१८१८५२३३२९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anshu Sinha

Digitally signed by Anshu Sinha
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a3a7504068b24f4e7eb0277456c1fe4e5d31e4d0b0fdc81eb8816e33c5735b5b, serialNumber=e71208cc885f6d3c01b374ed0921df256abda4ed94d69472deb566c39b4ee68c, cn=Anshu Sinha
Date: 2020.03.19 12:44:52 +05'30'

( अन्शु सिन्हा )

सचिव (प्र.सु.र.व का.)

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव ( ५ प्रती ),
२. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ( ५ प्रती ),
५. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
६. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
७. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
८. मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
९. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
११. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,

१२. प्रबंधक , लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,
१३. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१५. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१६. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१७. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई,
१८. सर्व विभागीय आयुक्त,
१९. सर्व जिल्हाधिकारी,
२०. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२१. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई ( ५ प्रती ),
२३. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी. डी. ओ. बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२०
२४. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०० ०२५.
२५. नॅशनलीस्ट काँग्रेस पार्टी, ठाकरसी हाऊस, जे. एन. हेरेडीया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८,
२६. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८.
२७. बहुजन समाज पार्टी, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी.एस.जी. भवन, प्लॉट नं. ८३-अे, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-४०० ०१४,
२८. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई ४००००४.
२९. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी मुंबई ४०००१३.
३०. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०० ०२८,
३१. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३२. निवड नस्ती ( कार्यासन १८ ).